| MHAK070010182017 | दाखल दिनांक | : ०६.११.२०१७ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : ०६.११.२०१७ |
| | निकाल दिनांक | : ०६.०७.२०२६ |
| | कालावधी | : ०८ व ०८ म ०० दि |

| | |
|---|---|
| | **नि.क्र.७५** |
| | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, बाळापूर**<br>(पिठासीन अधिकारी श्री डी. एम. वाघमारे)<br>न्यायनिर्णयाचा दिनांक ०६.०७.२०२६<br>नियमित फौजदारी खटला क्र.१६६/२०१७ |
| | अपराध क्रमांक : २०५/२०१७<br>पोलीस स्टेशन : बाळापूर, ता. बाळापूर जि. अकोला. |
| **फिर्यादी** | महाराष्ट्र सरकार,<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>**पोलीस स्टेशन बाळापूर**, ता. बाळापूर, जि. अकोला. |
| **फिर्यादीतर्फे वकिल** | श्रीमती फौजीया त. अ. सादिक, सहाय्यक सरकारी वकिल. |
| **आरोपी** | **१. गणेश बाबन वाडकर,**<br>वय ६० वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>**२. दिपक गणेश वाडकर,**<br>वय २२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>**३. सागर गणेश वाडकर,**<br>वय २० वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>**४. रामराव उर्फ रामा बाबन वाडकर,**<br>वय ६५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>सर्व रा. बजरंग चौक, वाडेगाव<br>ता. बाळापूर, जि. अकोला |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | विधीज्ञ श्रीमती एच. बी. टिकार |

**[फौजदारी मॅन्युअलमधील प्रकरण क्र.६ परीच्छेद ४४]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७.०५.२०१७ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्याची तारीख | २७.०५.२०१७ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०६.११.२०१७ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०७.११.२०२३ |

| | |
|---|---|
| पुराव्यास सुरुवात झाल्याची तारीख | ०४.०९.२०२५ |
| निकाल राखून ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | ०६.०७.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | -- |

## आरोपीची सविस्तर माहिती.

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला सजा झाली. | आरोपीची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गणेश बाबन वाडकर | ०५.०६.१७ | ०६.०६.१७ | भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४,५०६ सह-कलम ३४ अन्वये | निर्दोष सुटका ०६.०७.२०२६ | -- | -- |
| २. | दिपक गणेश वाडकर | | | | | | |
| ३. | सागर गणेश वाडकर | | | | | | |
| ४. | रामराव उर्फ रामा बाबन वाडकर | | | | | | |

**<u>सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी</u>.**

अ. **सरकारी साक्षीदारः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | गजानन रामभाऊ भामद्रे | (नि.क्र.३८) | जप्ती पंच |
| सा.क्र.२ | नितीन मार्तंडराव सरप | (नि.क्र.४०) | घटनास्थळ व जप्ती पंच |
| सा.क्र.३ | ज्ञानेश्वर काशिनाथ म्हैसने | (नि.क्र.५१) | घटनास्थळ व जप्ती पंच |
| सा.क्र.४ | अंबादास महादेव सरप | (नि.क्र.५९) | साक्षीदार |
| सा.क्र.५ | गुणवंत महावीर हरणे | (नि.क्र.६२) | दाखल अधिकारी |
| सा.क्र.६ | डॉ. जावेद खान अयुब खान | (नि.क्र.६६) | वैद्यकीय अधिकारी |

ब. **बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यासः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

क. **न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यासः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

**<u>सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी</u>.**

अ. **सरकार पक्षातर्फेः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| ०१ | ३९ | जप्ती पंचनामा |
| ०२ | ४१ | घटनास्थळ पंचनाम्यावर सा.क्र.२ ची सही |
| ०३ | ४२ | घटनास्थळ पंचनामा |
| ०४ | ४३ | निवेदन पंचनाम्यावरील सा.क्र.२ ची सही |
| ०५ | ४४ | जप्ती पंचनाम्यावरील सा.क्र.२ ची सही |
| ०६ | ५२ व ५३ | निवेदन व जप्ती पंचनाम्यावरील सा.क्र.३ ची सही |
| ०७ | ६३ | छापील एफआयआर |
| ०८ | ६७ | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ०९ | ६८ | वैद्यकीय अधिकाऱ्यास दिलेले पत्र |

ब. **बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क. **न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| ०१ | २६ | दोषारोप |
| ०२ | ७१ ते ७४ | फौ.प्र.सं. चे कलम नुसार जबाब |

ड. **जप्त वस्तुंचे वर्णनः–**

| अनुक्रमांक | वस्तूंचा नंबर | वस्तूचे वर्णन |
|---|---|---|
| ०१ | ४६/२०१७ | बांडीस (आर्टीकल १) |
| ०२ | –//– | धोतर (आर्टीकल २) |
| ०३ | –//– | एक दगड (आर्टीकल ३) |

## न्यायनिर्णय

(घोषणा तारीख ०६.०७.२०२६)

सदर खटला हा आरोपीं विरूध्द भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ आणि ५०६ सह–कलम ३४ या गुन्ह्याकरीता चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे –**

२. फिर्यादी नामे अनंता बाबन वाडकर याने बाळापूर पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट दिला की, फिर्यादी हा बजरंग चौक, वाडेगाव येथे राहत असून तो शेतमजूरीचे काम करतो. त्यास एकुण चार भाऊ असून त्यापैकी परशराम बाबन वाडकार हा मरण पावलेला आहे. फिर्यादी यांच्या वडीलोपार्जित जमीनीचा वाद सुरु होता. त्याबाबतची केस न्यायालयामध्ये दाखल होती. सदर केसचा निकाल हा फिर्यादी याच्या बाजूने लागला. दि.२६.०५.२०१७ रोजी फिर्यादी याच्या वडीलोपार्जित जागेत गणेश बाबन वाडकर व त्याचा भाऊ यांनी सामान आणून टाकले. फिर्यादीचे पुढे कथन असे की, दिनांक २७.०५.२०१७ रोजी सकाळी ८.३० ते ९.०० वा. सुमारास फिर्यादी व त्याचा भाऊ, गणेश वाडकर यांचे सामान घराबाहेर काढण्याकरीता गेले असता गणेश वाडकर व त्यांच्यामध्ये वाद झाला. त्यावेळी गणेश वाडकर यांची दोन मुले सागर व दिपक हे तेथे आले तसेच तेथे रामा वाडकर हा देखील आला. त्यांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन रामा वाडकर व दिपक वाडकर यांनी फिर्यादीस पकडून सागर वाडकर याने फिर्यादीस दगडाने डोक्यावर, दोन्ही पायांवर तसेच उजव्या डोळ्यावर मारहाण केली. गणेश वाडकर याने फिर्यादीस खाली पाडून घोळसले. त्यामुळे फिर्यादीस जखम झाली. त्यावेळी मोहल्यात राहणारे अंबादास महादेव सरप व इतर लोक त्या ठिकाणी आले व त्यांनी फिर्यादीस आरोपीच्या तावडीतून सोडविले. आरोपी यांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपी क्र.१ ते ४ यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन, बाळापूर येथे फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरून आरोपी क्र.१ ते ४ विरुध्द भा.दं. संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह–कलम ३४ अन्वये गुन्हा रजिस्टर क्रमांक २०५/२०१७ ची नोंद करण्यात आली. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने आरोपी क्र.१ ते ४ यांना दिनांक ०५.०६.२०१७ रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना दिनांक ०६.०६.२०१७

रोजी जामीन मंजुर केला. सदर गुन्ह्याचा तपास तपासिक अधिकारी श्री. गणेश बेदरकर यांनी केला. सदर गुन्ह्याच्या तपासकामी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला तसेच गुन्ह्यात वापरलेला दगड आरोपी क्र.३ कडून निवेदन व जप्ती पंचनाम्यानुसार जप्त केला. तसेच फिर्यादी याचे रक्ताने माखलेले कपडे जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त केले. तसेच जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. सदर गुन्ह्यातील साक्षीदारांचे जबाब नोंद केले. सदर गुन्ह्याच्या तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात त्यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पुर्वीचे सन्माननीय पिठासीन अधिकारी यांनी आरोपीवर भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह–कलम ३४ या गुन्ह्यांकरीता दोषारोप (नि.क्र.२६) ठेवला, तो आरोपींना मातृ भाषेत वाचून व समजावून सांगीतला. आरोपींनी सदर गुन्हा नाकबुल करुन खटला चालविण्याची मागणी केली. त्यानुसार त्यांचे प्रतिकथन नि.क्र.२७ ते ३० कडे नोंद करण्यात आले.

**५.** प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुध्द असलेला दोषारोप सिध्द करणेकरीता अभियोग पक्षाने एकुण ६ साक्षीदारांची साक्ष नोंद केलेली आहे. आरोपी क्र.१ ते ४ यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नि.क्र.७१ ते ७४ कडे नोंद करण्यात आला. त्यामध्ये आरोपींनी सदरची केस ही फिर्यादी याने खोटी केली असल्याचे सांगितले. आरोपींनी त्यांच्या बचावाकरीता कोणताही पुरावा दिलेला नाही.

**६.** अभिलेखावरील सर्व तोंडी व कागदोपत्री पुरावे यांचे अवलोकन केले. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजीया तबस्सुम अब्दुल सादिक आणि आरोपी तर्फे विधीज्ञ श्रीमती एच. बी. टिकार यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**७.** उपलब्ध पुरावे व उभय बाजुंचा युक्तीवाद यावरुन या प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, त्यासमोर मी माझे निष्कर्ष नोंदवले असून त्या खाली त्याची कारणमिमांसा नमुद केली आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक | **नकारार्थी.** |

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | २७.०५.२०१७ रोजी सकाळी ८.३० ते ९.०० वा. सुमारास बजरंग चौक, वाडेगाव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे आरोपींनी संगनमत करुन समान उद्देशाने आपखुशीने फिर्यादी अनंता बाबन वाडकर यास पकडून आरोपी क्र.१ याने त्यास खाली पाडून घोळसले व त्यामुळे फिर्यादीस दुखापत होण्यास कारणीभुत ठरले आणि त्या अन्वये आरोपींनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३२३ सह–कलम ३४ नुसार गुन्हा केला ? | |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद वेळी, ठिकाणी व दिवशी आरोपींनी संगनमत करुन आरोपी क्र.३ ने फिर्यादीस दगडाने ज्यामुळे मृत्यु होवू शकतो अशा साधानाने डोक्यावर, दोन्ही पायांवर, उजव्या डोळ्याखाली मारुन जखमी केले आणि त्या अन्वये आरोपींनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ सह–कलम ३४ नुसार गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद वेळी, ठिकाणी व दिवशी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीचा उद्देशपुर्वक अपमान व शिवीगाळ करुन त्यांना सार्वजनिक शांततेचा भंग करणेकरीता किंवा अन्य कोणताही अपराध करणेकरीता प्रक्षोभित केले आणि त्या अन्वये आरोपींनी भारतीय दंड संहितेच्या कलम ५०४ सह–कलम ३४ नुसार गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद वेळी, ठिकाणी व दिवशी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला व जिवे मारण्याची धमकी दिली आणि त्या अन्वये आरोपींनी भारतीय दंड संहितेच्या कलम ५०६ सह–कलम ३४ नुसार गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| ५. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे, निर्दोष मुक्तता.** |

## कारणमिमांसा

८. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी या प्रकरणात वरील प्रमाणे ६ साक्षीदार तपासण्यात आले. सर्व तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले.

**<u>मुद्दे क्र.१ ते ४ करीता</u>** –

९. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितरित्या नोंदविण्यात येत आहे. आरोपींविरुध्द असलेला दोषारोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने (सा.क्र.१) गजानन रामभाऊ भामद्रे, जप्ती पंच यांची साक्ष नोंद केलेली आहे. सदर साक्षीदार याने त्याच्या साक्षी पुराव्यात त्यास दि.२७.०५.२०१७ रोजी वाडेगाव येथील पोलीस चौकीमध्ये पंचनामा करणेकामी बोलाविले, त्या ठिकाणी पोलीसांनी एक धोतर व बांडीस मळलेले व रक्ताने माखलेले जप्त केले होते, त्याचा जप्ती पंचनामा सदर सा.क्र.१ याच्या समक्ष करुन तो मुद्देमाल एक लाल रंगाच्या प्रिटींगच्या पेपरमध्ये सेलोटेपने गुंडाळून त्यावर पंचांच्या सहीचे कागदी लेबल चिकटवून जप्त केले. सदर जप्त मुद्देमाल हा साक्षीदार याने न्यायालयात तोच असल्याबाबत ओळखला. त्यास आर्टीकल १ व २ देण्यात आले.

१०. (सा.क्र.१) याचा उलटतपास पाहता बचाव पक्षाने सदर साक्षीदार हा फिर्यादी यांचा मुलाचा मित्र असून ते दोघे एकत्र काम करीत असल्याबाबत साक्षीदार यास विचारणा केली होती. साक्षीदार यांनी सदरची बाब मान्य केलेली आहे. तसेच सदर साक्षी पुराव्याच्या दिवशी साक्षीदार हा फिर्यादीच्या मुलासोबत न्यायालयात आल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच सदर जप्ती पंचनाम्यातील मजकूर काय नमुद केला आहे, त्याबाबत माहित नसल्याचे देखील त्याने मान्य केले आहे. तसेच आर्टीकल १ व २ कडील मुद्देमाल हा त्यानी न्यायालयात पहिल्यांदाच पाहिला असल्याचे त्याने सांगितले. (सा.क्र.१) याचा पुराव्यातील मजकूर पाहता जरी त्याने त्याच्या सरतपासात अभियोग पक्षास जप्ती पंचनाम्याबाबत पुरक साक्ष दिलेली असली तरी सदर जप्ती पंचनाम्यातील मजकूर त्यास माहित नसल्याचे त्याने मान्य केले आहे. तसेच जप्त मुद्देमाल हा पोलीसांनी पोलीस स्टेशनला कोणाच्या ताब्यातून जप्त केला, याबाबत कोठेही स्पष्टता दिसत नाही. तसेच साक्षीदार याने आर्टीकल १ व २ कडील मुद्देमाल हा पहिल्यांदाच न्यायालयात पाहिला असल्याचे कबुल केले आहे. सबब, सदर साक्षी पुराव्यातील मजकूर पाहता सा.क्र.१ याचा साक्षी पुरावा अभियोग पक्षास जप्ती पंचनाम्याबाबत उपयुक्त ठरत नाही.

**११.** आरोपी क्र.३ याने फिर्यादीस दगडाने मारहाण करुन दुखापत केल्याचे आरोपाबाबत तसेच गुन्ह्यात वापरलेला दगड सिध्द करण्याबाबत (सा.क्र.२) नितीन मार्तंडराव सरप व (सा.क्र.३) ज्ञानेश्वर काशिनाथ म्हैसने यांचा साक्षी पुरावा नोंद करण्यात आला. (सा.क्र.२) व (सा.क्र.३) हे निवेदन व जप्ती पंचनामा तसेच घटनास्थळ पंचनामा चा पंच असल्याचे दिसते, परंतु त्याने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. (सा.क्र.२) व (सा.क्र.३) यांनी त्याच्या उलटतपासात मान्य केले आहे की, पोलीसांनी त्याच्या सह्या अगोदर तयार करुन ठेवलेल्या मजकूरावर घेतल्या. सबब, (सा.क्र.२ व ३) याचा साक्षी पुरावा देखील अभियोग पक्षास उपयुक्त होत नाही.

**१२.** (सा.क्र.४) अंबादास महादेव सरप हा सदर तथाकथित घटनेचा प्रत्यक्षदर्शी असून त्याने सदर तथाकथित घटनेबाबत फिर्यादीस आरोपीने केलेल्या मारहाणीबाबत त्याच्या पुर्व जबाबाशी विसंगत साक्ष दिलेली आहे. सदर साक्षीदार याने अभियोग पक्षास सहाय्य केले नसल्याने त्याचा साक्षी पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त होत नाही.

**१३.** सदर घटनेतील फिर्यादी अनंता वाडकर हा दिनांक २३.१०.२०२४ रोजी मयत झाल्याने त्याचा साक्षी पुरावा नोंद करण्यात आलेला नाही. त्यामुळे फिर्यादी याने त्याच्या फिर्यादीत नमुद केलेला मजकूर सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने दाखल अधिकारी (सा.क्र.५) गुणवंत महावीर हरणे यांची साक्ष नोंद केलेली आहे. त्यांनी त्यांच्या साक्षी पुराव्यात फिर्यादी यांच्या सांगण्याप्रमाणे फिर्यादीतील मजकूर नमुद केला असल्याचे त्याने सांगितले आहे. परंतु, फिर्यादीचा दिनांक २७.०५.२०१७ चा जबानी रिपोर्ट यास निशाणी देण्यात आल्याचे दिसत नाही. केवळ सदर गुन्ह्यातील छापील फिर्याद (नि.क्र.६३) कडील मजकूराबाबत (सा.क्र.५) याचा साक्षी पुरावा दिसून येतो.

**१४.** (सा.क्र.५) यांनी मान्य केले आहे की, सदर गुन्हा दाखल करतेवेळी त्याने फिर्यादी अथवा श्री. गोवर्धन यांच्या कडे कोणत्याही कागदपत्रांची मागणी केली नाही. तसेच इतर कागदपत्रांची देखील शहानिशा केली नाही. केवळ दाखल अधिकारी यांनी फिर्यादीमध्ये नमुद केलेला मजकूर हा फिर्यादीच्या सांगण्यावरुन नमुद केला असला तरी सदर मजकूराबाबतची सिध्दता ही इतर संबंधित साक्षीदार यांच्या साक्षी पुराव्यातून सिध्द होणे

आवश्यक आहे. तसेच फिर्यादी याचा जबानी रिपोर्टमधील मजकूर हा सिध्द होवू शकलेला नाही.

**१५.** फिर्यादी यास झालेल्या दुखापतीची सिध्दता करणेकामी अभियोग पक्षाने (सा.क्र.६) यांची साक्ष नोंद केलेली आहे. (सा.क्र.६) डॉ. जावेद खान अयुब खान यांनी त्यांच्या साक्षी पुराव्यात कथन केले आहे की, दिनांक २७.०५.२०१७ रोजी ते वाडेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे कार्यरत होते. त्या दिवशी पो.कॉ. गोवर्धन, ब.क्र.७७८ यांनी जखमी अनंता बाबन वाडकर यास वैद्यकीय उपचारासाठी आणले होते. त्याबाबतचे पत्र देखील त्यांनी स्वीकारले होते. सदर जखमी याची वैद्यकीय तपासणी केली असता त्यास ४ x १ सेंमी ची डोक्यात कापीव जखम, डाव्या मांडीस ३ x ६ मेंमी ची जखम तसेच उजव्या हाताच्या कोपरास ३ x २ सेंमी ची खरचटल्याची जखम तसेच उजव्या डोळ्याच्या खाली २ x २ सेंमी खरचटल्याची जखम दिसून आली. सदरच्या जखमा ह्या साध्या स्वरुपाच्या व अर्धा ते एक तास उपचाराच्या आधीच्या असल्याबाबत त्यांनी सांगितले. तसेच सदरच्या जखमा ह्या ओबडधोबड वस्तूने झाले असल्याचे कथन केले आहे. त्याबाबतचे नि.क्र.६७ कडे जखमांची वैद्यकीय प्रमाणपत्र (सा.क्र.६) यांनी पोलीसांना दिले. तसेच आर्टीकल ३ कडील दगडाने सदर जखमा झाले असल्याबाबतचे मत त्यांनी सांगितलेले आहे.

**१६.** (सा.क्र.६) यांनी त्यांच्या उलटतपासात नि.क्र.६७ मधील नमुद असलेल्या जखमा ह्या खरचटलेल्या असल्याचे अमान्य केले आहे. तसेच सदरच्या जखमा ह्या एखादा व्यक्ती कडक जागेवर पडल्याने झाल्याबाबतची शक्यता देखील त्यांनी नाकारलेली आहे. (सा.क्र.६) यांचा साक्षी पुरावा पाहता तसेच नि.क्र.६७ मधील नमुद असलेल्या जखमा पाहता सदरच्या जखमा ह्या जखमी नामे अनंता वाडकर यास झाल्या असल्याबाबत दिसून येते. वैद्यकीय अधिकारी यांच्या पुराव्यातील मजकूर हा कोठेही अविश्वासार्ह दिसून येत नाही. तसेच सदर साक्षीदार हा स्वतंत्र व सदर जखमांविषयी वैद्यकीय अधिकारी असल्याने त्याच्या साक्षी पुराव्यातील मजकूर यावर अविश्वास दाखविता येणार नाही.

**१७.** सदर गुन्ह्यातील तपासिक अधिकारी रविंद्र भिकाजी पाटीलखेडे हे दिनांक ०७.०५.२०१८ रोजी मयत असल्याने त्यांचा साक्षी पुरावा नोंद करण्यात आलेला नाही. त्यांच्या मृत्युचे प्रमाणपत्र नि.क्र.६० कडे दाखल केलेले आहे.

१८. जरी (सा.क्र.६) यांनी जखमी नामे अनंता बाबन वाडकर यास नमुद केलेल्या जखम क्र.१ ते ४ या झाल्या असल्याबाबत सांगितले असले तरी सदर जखमा होण्यास आरोपी कारणीभुत आहेत, याबाबतचा ठोस पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक आहे. तसेच ज्या वस्तूने फिर्यादीस जखम झाली त्याची सिध्दता अभियोग पक्षाने करणे आवश्यक आहे. सा.क्र.१ ते ५ यांचा साक्षी पुरावा पाहता सदर घटनेबाबत पुष्टी करण्याकरीता एकही साक्षीदार विश्वासार्ह ठरण्यास पात्र नाही. तसेच सदर घटनेतील सा.क्र.४ अंबादास महादेव सरप हा प्रत्यक्षदर्शी असला तरी त्याने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. तसेच सदर गुन्ह्यात वापरलेला तथाकथित दगड याबाबतची देखील सिध्दता जप्ती पंच व साक्षीदार यांच्याकडून झालेली नाही. म्हणून आरोपींविरुध्द असलेला दोषारोप पुरेशा पुराव्याअभावी सिध्द होण्यास मदत होत नाही. म्हणून मी मुद्दे क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ५ करीता :–**

१९. आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप शाबीत करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर आहे. वर चर्चिल्याप्रमाणे आरोपीने गुन्हा केला आहे हे शाबीत करण्यास अभियोग पक्ष हे सफल झाले नाही. या सर्व बाबींचे अवलोकन करुन प्रस्तुतच्या खटल्यात आरोपीला दोषी ठरविण्या इतपत पुरावा नसल्याने निर्दोष मुक्त करणे न्यायाचे ठरते. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**:: आदेश ::**

१. आरोपी क्र.१ **गणेश बाबन वाडकर,** आरोपी क्र.२ **दिपक गणेश वाडकर,** आरोपी क्र.३ **सागर गणेश वाडकर** आणि आरोपी क्र.४ **रामराव उर्फ रामा बाबन वाडकर** यांना भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह–कलम ३४ च्या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

**३.** जप्त मुद्देमाल एक धोतर व बांडीज तसेच एक दगड हे मुल्यहीन व निरुपयोगी असल्याने त्याचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा. तसेच इतर काही मुद्देमाल असल्यास अपील कालावधीनंतर त्याची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

**४.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे जामीन मुचलके व जामीनदार याची पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.07.06 17:27:11 +0530

**दिनांक : ०६.०७.२०२६.** **( डी. एम. वाघमारे )**
**ठिकाणः बाळापूर** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०६/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०६/०७/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०६/०७/२०२६ |